# ‘संस्कृत भाषा व्यावहारिक व्हावी’

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

‘प्रत्येकाने आकाशवाणी, दूरदर्शन आणि मुद्रण माध्यमांद्वारे संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार करणे आवश्यक आहे. परंतु, व्यावहारिक स्तरावरही त्याचा अधिकाधिक वापर होणे गरजेचे आहे. संस्कृत भाषेत ध्वनिविज्ञान आहे. ही वैज्ञानिक भाषा असून तिची वैशिष्ट्ये जपली पाहिजेत’, अशी भावना संस्कृत वृत्तनिवेदक आणि उज्जैनच्या कालिदास संस्कृत अकादमीचे माजी संचालक बलदेवानंद सागर यांनी व्यक्त केली.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे आयोजित द्विदिवसीय भारतवर्षीय संस्कृत संमेलनाचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उमा वैद्य होत्या. राष्ट्रीय संस्कृत संस्थेचे प्रा. रमाकांत पांडे यांच्यासह कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, समन्वयक डॉ. नंदा पुरी, सहसमन्वयक डॉ. कविता होले व वेदविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. विजयकुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.



संस्कृत संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना बलदेवानंद सागर. व्यासपीठावर डॉ. अरविंद जोशी, प्रो. रमाकांत पांडे, डॉ. उमा वैद्य व इतर.

प्रो. रमाकांत पांडे यांनी ‘अनेक ग्रंथ आणि विषय अस्पृष्ट असल्यामुळे त्यांचे परिशीलन युवा अभ्यासकांनी करावे आणि संस्कृत भाषा आणि शास्त्राध्ययन परंपरा जपावी’, असे आवाहन केले. संस्कृतातील पारंपरिक विषयांना आधुनिक संदर्भात अभ्यासण्याचे कार्य या संमेलनाद्वारे करण्याचा मानस असल्याचे डॉ. उमा वैद्य यांनी सांगितले. गोगटे-जोगळेकर कॉलेजचे तन्मय हर्डीकर व मूळजी जेठा महाविद्यालयाच्या रेणुका रत्नपारखी यांनी मनोगत व्यक्त केले. संमेलनाला देणगी देणाऱ्या प्रभाकर भातखंडे, सुरेखा जोशी, वीणा गोडबोले यांचा सत्कार करण्यात आला. अपेक्षा घाटे, जान्हवी देऊळगावकर, आनंदो घोष, श्रीमती जारोलिया, शुभांगी नायब या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट निबंध सादर केल्याबद्दल पारितोषिक देण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. रेणुका बोकारे यांनी केले. आभार डॉ. कविता होले यांनी मानले.